1

महाराष्ट्र शासन

तात्काळ/महत्वाचे

क्र. संकीर्ण २००९/(७१/०९)/साशि-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक १५ जून ,२००९

प्रति —

सह सचिव (व्यशि/विशि/मशि)
उप सचिव (तांशि/आस्था), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई
संचालक, व्यवसाय प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, ग्रंथालय , महाराष्ट्र राज्य , मुंबई
संचालक, कला, महाराष्ट्र राज्य , मुंबई
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

विषय - अर्थसंकल्पित तरतूद २००९-२०१० अंतर्गत बांधकामे, योजनांवरील खर्च व शैक्षणिक बाबी इत्यादींचा आढावा बैठक

महोदय,

मा. प्रधान सचिव (उ. व तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.६.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

आपला

(स्वाक्षरी)

( दि. बा. मुजुमदार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

जा.क्रं.विकापु/आस्था-२/संकिर्ण/२००९/ 6930

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे - ४११० ०१६
दिनांक : २२ जून २००९
22 JUN 2009

मा. अवर सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्राची व सहपत्राची प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी, त्यांना कळविण्यात येते की, मा. प्रधान सचिव यांनी अर्थसंकल्पित तरतूद सन २००९-१० मध्ये खरेदी करावयाची साधन सामुग्री, बांधकामे व जिल्हा नियोजन व विकास मंडळाने केलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने दि.१२-६-२००९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करुन आवश्यक कार्यवाही करावी.

प्रतः- प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

(स्वाक्षरी)

(गो.पं.चौधरी)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

# बैठकीचे इतिवृत्त

मा. प्रधान सचिव (उ.व तं.शि.) यांनी अर्थसंकल्पित तरतूद सन २००९-१० **मध्ये खरेदी** करावयाची साधन सामुग्री, बांधकामे व जिल्हा नियोजन व विकास मंडळाने केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने विभागाच्या अखत्यारितील सर्व संचालक / सह संचालक / उप संचालक यांचेशी दिनांक १२.०६.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित करुन बैठकीमध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे सूचना केलेल्या आहेत :-

१. सर्व संचालकांनी त्यांना कोणत्या कामासाठी किती निधी उपलब्ध होणार आहे याची माहिती घ्यावी.

२. विधान सभेच्या निवडणूकीची आचारसंहिता १५ ऑगस्टच्या दरम्यान सुरु होणार असल्याने उपलब्ध निधीमधून साधनसामुग्री आणि यंत्रसामुग्रीच्या खरेदीचे आदेश ३१ जूलै,२००९ पर्यंत पुरवठादारांना देण्यात यावेत.

३. सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधकामाच्या कामाबाबतचे आदेश ३१ जूलै,२००९ पर्यंत काढावेत आणि त्यासाठी सहसंचालकांनी संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांशी संपर्क साधून बांधकामाला सुरुवात करुन घ्यावी.

४. काही गोष्टींसाठी अर्थसंकल्पिय तरतूद करावयाची राहून गेली असल्यास ती डिसेंबर महिन्यात अधिवेशनात करुन घेण्यात यावी.

५. BDS करताना खर्च कोणत्या कालावधीत होणार आहे तो विचारात घेऊन तो जागरुकतेने करावा.

६. अर्थसंकल्पित झालेली तरतूद ३१ जानेवारी,२०१० पर्यंत खर्च होईल याकडे लक्ष द्यावे.

७. सर्व महाविद्यालयांचे संस्थानिहाय नियोजन केलेले नसल्यास ते करण्यात यावे.

८. महाविद्यालये, संस्थांमधील वर्गखोल्या, बाकडी, कंपाऊंड, फळा, प्रसाधन गृह, परिसर या सर्वांचा दर्जा चांगला राहील याकडे संस्था प्रमुखांनी आणि सह संचालकांनी लक्ष ठेवावे.

९. अत्यावश्यक बाबी कोणत्या आहेत याचा संचालकांनी आढावा घेऊन ती उपकरणे खरेदी करावीत आणि काही कमतरता असल्यास त्या दुर करण्यात याव्यात.

१०. योजनानिहाय बजेट असल्याने प्रोजेक्ट रिपोर्टसह खर्चाच्या पध्दती ठरविण्यात याव्यात.

११. सहसंचालकांनी तसेच संस्थाप्रमुखांनी संचालक स्तरावर आणि शासन स्तरावर चर्चा करुन योजनेचा पाठपुरावा करावा.

१२. सह संचालकांनी खर्चासाठी विद्यापीठे, महाविद्यालये, संस्था यांचे प्रस्ताव मागवून घेण्यात यावेत.

१३. ठराविकच उपकरणे खरेदी करावयाची असल्यास स्पष्टीकरण करण्यात यावे.

१४. संचालक / सह संचालक यांनी त्यांच्या कार्यालयीन स्तरावर किमान दोन कर्मचा-यांचा गट करुन योजनेचा पाठपुरावा करावा.

१५. प्रत्येक आठवडयात संचालकांनी योजनेच्या खर्चाचा आढावा घ्यावा.

१६. भविष्यात किती महाविद्यालये, आय.टी.आय., अभियांत्रिकी कॉलेज, तंत्र निकेतने यांची आवश्यकता राहील याचा बृहत आराखडा करण्यात यावा.

१७. पुढील ५ वर्षांत प्रत्येक कोर्ससाठी / विषयासाठी वर्षनिहाय आराखडा तयार करण्यात यावा.

१८. सर्व महाविद्यालये, आय.टी.आय., तंत्रनिकेतने, यांचे दर्जात्मक मूल्यांकन करुन घेण्यात यावे.